॥ रामा हृदयी राम नाही ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः पी. सावळाराम
संगीतः वसंत प्रभू

रामा हृदयी राम नाही
पतिव्रते, चारुते, सीते,
का रडसि धायी धायी ॥ धृ. ॥

राहिलीस तू रावण सदनी
शंकित होता ती जनवाणी ।
त्यजिता तुजला याच कारणी
सर्वसाक्षी सर्वज्ञानी
राम तुझा तो उरला नाही ॥ १ ॥

पावित्र्याला कलंक लावून
पतितची झाला पतितपावन ।
करण्या पावन तो रघुनंदन
पतिव्रते ग लाव पणाला
शतजन्माची तव पुण्याई ॥ २ ॥

लोकाग्रणी त्या रामहृदयी
जनतारुपी तूच सीता ।
तुला कलंकित तूच म्हणता
व्याकुळ झाला तव हृदयी का
करुणाकर प्रभू रामचंद्रही ? ॥ ३ ॥